# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः30.12.2025** **वारःमंगळवार**

---

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस

राज्यभरात राजकीय घडामोडी गतिमान; युती-आघाडीबाबत ठीकठिकाणी वेगवेगळं चित्र

नववर्ष स्वागतासाठी राज्यात सर्वत्र जय्यत तयारी

आणि

महिला क्रिकेटमध्ये भारत आणि श्रीलंका यांच्यात आज 20 षटकांचा पाचवा सामना

**<u>निवडणूकसमग्र</u>**

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस आहे. उद्या या अर्जांची छाननी होईल. 2 जानेवारीपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. 3 जानेवारीला निवडणूक चिन्हाचं वाटप होईल आणि अंतिम उमेदवार यादी प्रसिद्ध होईल. येत्या 15 जानेवारीला मतदान होणार असून 16 जानेवारीला मतमोजणी होईल.

उमेदवारी अर्ज दखल करण्याच्या अखेरच्या टप्प्यात राज्यभरात राजकीय घडामोडी गतिमान झाल्या आहेत. विविध राजकीय पक्षांनी युती-आघाडीबाबतचे निर्णय स्थानिक पातळीवर घेतले आहेत.

पुणे महापालिकेची निवडणूक भाजपा, शिवसेना आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया महायुती म्हणून लढवत असून मित्र पक्षांना सन्मानजनक जागा देण्यात येतील असं भाजपाचे गणेश बिडकर यांनी काल पत्रकारांशी बोलताना सांगितलं.

मात्र भाजपाकडून सन्मानजनक जागा न मिळाल्यानं शिवसेनेनं राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर चर्चा सुरू केल्याचं वृत्त आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेची निवडणूक एकत्रित लढवणार असल्याची घोषणा आमदार रोहित पवार यांनी केली. दोन्ही पक्ष आपापल्या चिन्हांवर लढतील असं त्यांनी सांगितलं.

पुणे महापालिकेसाठी काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, मनसे आणि वंचित बहुजन आघाडी हे पक्ष एकत्र निवडणूक लढणार आहेत. पिंपरी चिंचवडमध्ये मात्र वंचित बहुजन आघाडी स्वतंत्र लढणार आहे.

सांगली-मिरज-कुपवाड महापालिकेची शिवसेना एकट्यानं लढवणार असल्याची घोषणा मंत्री शंभुराज देसाई यांनी काल केली. महायुतीत सन्मानजनक जागा न मिळाल्यानं हा निर्णय घेतल्याचं ते म्हणाले.

अहिल्यानगर महानगरपालिकेत शिवसेना स्वतंत्र जागा लढवणार असल्याचं जिल्हाध्यक्ष अनिल शिंदे यांनी सांगितलं.

कोल्हापूरमध्ये महायुतीमध्ये एकमत झालं असून 81 जागांपैकी भाजपा 36 जागांवर निवडणूक लढवणार असून शिवसेनेला 30 तर राष्ट्रवादी काँग्रेसला 15 जागा मिळाल्या आहेत. दुसरीकडे, कोल्हापूरमध्ये महाविकास आघाडीमध्ये फुट पडली असून राष्ट्रवादी काँग्रेस शरचंद्र पवार पक्षाने तिसऱ्या आघाडीसोबत हातमिळवणी केली आहे. त्यामुळे कोल्हापुरात काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट एकत्रित निवडणूक लढवत आहेत.

धुळे महापालिका निवडणुकीसाठी भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक लढवणार आहेत. तर महाविकास आघाडी एकत्रितपणे लढणार आहे.

दरम्यान जागा वाटपाची गणितं जुळल्यानंतर विविध पक्षांनी उमेदवारांची यादी जाहीर केली. त्यानंतर राज्यभरात अर्ज भरण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. मुंबईसाठी काँग्रेसने ८७ उमेदवारांची तर राष्ट्रवादी काँग्रेसने ३७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं सात उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली.

पुणे महापालिकेसाठी भाजपाने पहिली यादी काल जाहीर केली. अनेक माजी नगरसेवकांची उमेदवारी भाजपानं कायम ठेवली आहे.

**<u>वर्षाअखेर-अयोध्या ते युनेस्को</u>**

**<u>इंट्रो</u>-**

भारताची समृद्ध सांस्कृतिक ओळख जपण्यासाठी गेल्या दशकात अनेक पातळ्यांवर प्रयत्न करण्यात आले. २०२५ या वर्षातही भारतात सांस्कृतिक क्षेत्रात अनेक उल्लेखनीय घडामोडी झाल्या. 'सुधारणांचे वर्ष' या विशेष मालिकेत भारताच्या सांस्कृतिक घडामोडींविषयी ऐकूया माझ्या सहकारी संध्या खान यांच्याकडून...

*स्क्रीप्ट-*

*प्रयागराजमध्ये ६६ कोटींहून अधिक भाविकांनी महाकुंभमध्ये सहभाग घेतला, हा एक जागतिक विक्रम होता. श्रद्धा, अध्यात्म आणि परंपरा यांचा संगम साधण्यातील भारताची अतुलनीय क्षमता यातून सिद्ध झाली. २५ नोव्हेंबरला एका ऐतिहासिक क्षणामध्ये, पंतप्रधानांनी अयोध्येतील श्री रामजन्मभूमी मंदिरावर भगवा धर्मध्वज फडकवला. भारतीय भक्ती परंपरा, मंदिराची पूर्तता आणि भारताच्या सांस्कृतिक आत्मविश्वासाचं पुनरुत्थान यांचं ते प्रतीक होतं. 'प्रसाद' योजनेअंतर्गत, पंतप्रधानांनी पुनर्विकसित त्रिपुरा सुंदरी मंदिराचे उद्‌घाटन केलं. या प्रकल्पामुळं ५२४ वर्षे जुन्या आध्यात्मिक स्थळाचं पुनरुज्जीवन झालं. राष्ट्रगीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त कोट्यवधी भारतीयांनी या गीताचं गायन सादर करून त्याची आठवण केली. स्वातंत्र्य चळवळीला चेतना देणाऱ्या या राष्ट्रीय चिन्हाचं रूपांतर एका सार्वजनिक चळवळीत झालं. भारतातील मराठा लष्करी स्थळांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत भारताची ४४ वी संपत्ती म्हणून यशस्वीपणे समावेश करण्यात आला. जागतिक वारसा शक्ती म्हणून भारताचं स्थान लक्षणीयरीत्या भक्कम झालं. दीपावली, प्रकाशाचा सणही, युनेस्कोच्या अमूर्त सांस्कृतिक वारसा यादीत समाविष्ट झाला. या यादीतील हा १६ वा भारतीय घटक आहे. प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात ‘जयति जय मम भारतम्’ या विलक्षण सांस्कृतिक सादरीकरणात पाच हजारपेक्षा अधिक कलाकारांनी भारताच्या आदिवासी आणि लोककला वारशाचं दिमाखदार प्रदर्शन घडवलं. हा देखील एक विश्वविक्रम ठरला.*

**<u>सेंदियउदबत्ती</u>**

धाराशिव जिल्ह्यातल्या श्री तुळजाभवानी देवीच्या शांकभरी नवरात्र महोत्सवाला रविवारपासून प्रारंभ झाला. तीन जानेवारीपर्यंत चालणाऱ्या या महोत्सवात अलंकार, मुरली अलंकार, शेषशाही अलंकार, भवानी तलवार आदी पूजा होणार आहेत. दरम्यान तुळजा भवानीच्या मंदिरात अर्पण केलेल्या फुलांपासून सेंद्रिय अगरबत्ती तयार करण्याचा पर्यावरणपूरक उपक्रम श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने राबवला जात आहे, ऐकुया याविषयी सविस्तर माहिती

***स्क्रिप्ट***

*देवीच्या चरणी आणि मंदिर परिसरातील इतर देवतांच्या चरणी अर्पण करण्यात आलेली फुले नियमितपणे गोळा करण्यात येतात. ही फुले सेंद्रिय पद्धतीने वाळवून त्यांची बारीक पावडर तयार केली जाते. त्यानंतर या पावडरमध्ये सेंद्रिय घटक आणि नैसर्गिक तेल मिसळून पूर्णतः रसायनविरहित अगरबत्ती तयार केली जाते. या प्रक्रियेमुळे निर्माल्याचे पावित्र्य अबाधित राहतेच, शिवाय पर्यावरण संवर्धनालाही चालना मिळते. अगरबत्तीबरोबरच धूप, उद तसेच हवन कप देखील विक्रीस उपलब्ध करून देण्यात आले आहेत. ही सर्व उत्पादने रसायनमुक्त असून पूर्णतः सेंद्रिय असल्याने आरोग्य आणि पर्यावरणाच्या दृष्टीने सुरक्षित आहेत -देविदास पाठक आकाशवाणी वार्ताहर धाराशिव*

**नववर्षस्वागत**

नववर्ष स्वागताची सर्वत्र जय्यत तयारी सुरू असून राज्यातली पर्यटन स्थळ पर्यटकांनी फुलून गेली आहेत. महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाच्या रिसॉर्टसह खासगी हॉटेलमध्येही पर्यटकांचा ओघ वाढला आहे. नववर्ष स्वागताच्या पार्श्वभूमीवर पुणे वाहतूक पोलिसांनी शहराच्या विविध भागांमध्ये नाकाबंदी करून वाहनांची तपासणी केली. गेल्या चार दिवसांत मद्यपान करून वाहन चालवणाऱ्या 242 वाहन चालकांविरुद्ध पोलिसांनी कायदेशीर कारवाई केली आहे. मुंबईतल्या विविध खासगी आणि सार्वजनिक स्थळांवर होणाऱ्या कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर अग्निशमन दलाने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

**विजयस्तंभअभिवादन**

कोरेगाव भीमा इथल्या विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी पुणे जिल्हा प्रशासनानं आवश्यक तयारी केली आहे. हा सोहळा शांततेत पार पाडण्यासाठी आवश्यक ती काळजी घेण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाने विविध यंत्रणांना केल्या आहेत.

**डॉ.स्वातीमहाळंक**

स्वातंत्र्य, समता, बंधुता यासारख्या लोकशाही मूल्यांची ओळख महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकामध्ये जनतेला करून दिली, असं प्रतिपादन बसव साहित्याच्या अभ्यासक, ज्येष्ठ पत्रकार डॉक्टर स्वाती महाळंक यांनी सोलापूर इथं केलं. महात्मा बसवेश्वर यांचे विचार आणि कार्य, या विषयावर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आणि संगमेश्वर महाविद्यालयानं आयोजित केलेल्या राष्ट्रीय परिषदेमध्ये काल त्यांनी बीजभाषण केलं. महात्मा बसवेश्वरांनी क्षूद्रातिक्षूद्र लोकांनाही अनुभव मंटपाच्या माध्यमातून मत व्यक्त करण्याचे अधिकार दिले, असं त्या

म्हणाल्या. महाराष्ट्रासह कर्नाटक, तेलंगणमधील बसवेश्वर तत्वज्ञानाचे अभ्यासक, संशोधक आणि विद्यार्थी या परिषदेमध्ये सहभागी झाले होते.

**<u>बेस्टअपघात</u>**

मुंबईत भांडुप इथं बेस्टच्या बस चालकाकडून बस मागे घेताना बसखाली 13 जण चिरडले गेले. या दुर्घटनेत चौघांचा मृत्यू झाला. तर 10 जण जखमी झाले. जखमींपैकी काहींची प्रकृती गंभीर असल्याचं समजतं. या दुर्घटनेबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दु:ख व्यक्त केलं असून मृतांच्या वारसांना 5 लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे.

**<u>क्रिकेट</u>**

महिला क्रिकेटमध्ये भारत आणि श्रीलंका यांच्यातला 20 षटकांचा पाचवा आणि अंतिम सामना आज थिरूवनंतपुरम इथं खेळला जाणार आहे. सामना संध्याकाळी सात वाजता सुरू होईल. पाच सामन्यांच्या मालिकेतील चार सामने जिंकून भारतानं विजयी आघाडी घेतली आहे. आजचा सामना जिंकून या मालिकेत निर्भेळ यश मिळवण्यासाठी हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाचा प्रयत्न असेल.

**<u>भूकंप</u>**

हिंगोली जिल्ह्यात आज सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास भूकंपाचा धक्का जाणवला. वसमत, औंढा, कळमनुरी तालुक्यातील 40 ते 50 गावांमध्ये हा धक्का जाणवल्याचं आमच्या वार्ताहरानं दिलेल्या बातमीत म्हटलं आहे.

**<u>हवामान</u>**

राज्याच्या बहुतांश भागात थंडीचा जोर कायम आहे. काल अहिल्यानगरमध्ये राज्यातल्या सर्वात कमी, म्हणजे 7 पूर्णांक 7 अंश सेलसीयस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली. येत्या 24 तासात राज्यात सर्वत्र कोरडं हवामान राहण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं,**

**नमस्कार.**